**नियमित दिवाणी दावा क्र.११४/२०२१**

शोभा टोंगळे वि. सोमनाथ कडबाने व इतर

**CNR No. MHSO07-000145-2021**

**<u>निशाणी क्र.५९ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ अन्वये कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी दाव्याच्या कामी हजर होऊन नि.क्र.३० कडे कैफियत दाखल केली आहे. त्यानंतर दिनांक १३/०९/२०२४ रोजी वादीच्या फिर्यादवरुन दाखल झालेल्या संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१८४९/२०२० चे कामी ४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पंढरपूर यांच्या कोर्टात हजर राहण्यासाठी प्रतिवादीस समन्स प्राप्त झाले. सदर फिर्यादमधील तथ्य लपवून वादीने प्रस्तुतचा निरंतर ताकिदीचा दावा दाखल केलेला आहे. त्यानंतर वादीने नि.क्र.५३ च्या अर्जासह दिलेल्या नि.क्र.५७ च्या म्हणण्यामध्ये देखील दाव्यातील वाद कथनांची पुनरूक्ती केलेली आहे. वरील बाबींचा विचार करता कैफियतीमध्ये कलम १२अ समाविष्ठ करणे गरजेचे झाले आहे. प्रतिवादीने अर्जाच्या कलम २ मध्ये कैफियतीचे कलम १२अ बाबतचा मजकूर नमूद केलेला आहे.

३. सदर अर्जास वादी यांनी नि.क्र.६१ कडे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, नियोजित दुरुस्ती कैफियत देतेवेळी का नमूद केले नाही याचे कारण अथवा खुलासा प्रतिवादीने अर्जात दिलेली नाही. सदरची दुरुस्ती असंदिग्ध व अनावश्यक आहे. दाव्याचे कामकाज लांबणीवर पडावे व वादीस खर्चात पाडावे या उद्देशाने प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती

केली.

४. प्रतिवादी सदर दुरुस्ती अन्वये वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेल्या फौजदारी खटल्याची बाब अभिलेखावर आणू इच्छीतात. सदरची बाब प्रतिवादी यांना दिनांक २३/०९/२०२४ रोजी सदर खटल्याचे समन्स आल्यानंतर मिळाल्याचे दिसून येते. कैफियतीच्या कलम १२अ मध्ये प्रतिवादी यांनी जी नियोजित दुरुस्ती मागितली आहे त्या दुरुस्तीमुळे कैफियतीमध्ये कोणताही अमुलाग्र बदल होणार नाही. सदर दुरुस्तीमुळे निव्वळ वादी व प्रतिवादी यांच्यामधील खटल्याची बाब अभिलेखावर येणार आहे. सबब अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादीने नियमानुसार १४ दिवसांच्या आत कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त कैफियतीची प्रत अभिलेखावर दाखल करावी. |

PRIYANKA RAMESH PATIL

Digitally signed by PRIYANKA RAMESH PATIL
Date: 2026.01.19 12:52:40 +0530

दिनांक:– ०८.०१.२०२६ (पी. आर. पाटील)

५वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पंढरपूर.

**<u>Certificate</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 5th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 08.01.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 09.01.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 19.01.2026 |